# विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित

**महिला कला—वाणिज्य महाविदयालय चांदुर— रेल्वे जि. अमरावती**

## <u>करियर कट्टा उपक्रमातर्गत</u>

## <u>कार्यक्रमांचा अहवाल</u>

### सत्र २०२२—२०२३ व सत्र २०२३—२०२४

**१. <u>करियर कट्टा उपक्रमाचे उदघाटन</u>**

दिनांक ०७ एप्रिल, २०२२ ला करियर कट्टा कक्षाचे उदघाटन चांदुर रेल्वे पोलिस स्टेशनचे उपविभागीय पोलीस अधिकारी जितेंद्र जाधव यांच्या हस्ते फित कापून करण्यात आली. तसेच त्यांनी स्पर्धा परीक्षेविषयी सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविदयालयाच्या प्राचार्य डॉ. सीमा जगताप हया होत्या. या कार्यक्रमाचे आयोजन करियर कट्टा समन्वयक प्रा. अनिता एस. धुर्वे यांनी केले. तसेच प्रास्ताविकेत करियर कट्टा उपक्रमाविषयी माहिती दिली. यावेळी महाविदयालयातील सर्व प्राध्यापक तसेच महाविदयालयीन विदयार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

**२. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम**

दिनांक २५ एप्रिल, २०२२ ला 'स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी' या विषयावर सहायक पोलीस निरीक्षक निता तागडे पोलीस स्टेशन चांदुर रेल्वे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा जगताप हया होत्या. तसेच महाविदयालयातील प्राध्यापक, विदयार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

**३. <u>करियर कट्टा उपक्रमात नोंदनी मार्गदर्शन</u>**

दिनांक ०५ ऑगष्ट, २०२२ ला करियर कट्टा उपक्रमात नोंदनी कशी करावी याविषयी सखोल मार्गदर्शन करियर कट्टा समन्वयक प्रा. अनिता एस. धुर्वे यांनी केले. विदयार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

**४. करियर कट्टा उपक्रमात सहभागी मुलींची संख्या—**

दि. ०२ सप्टेंबर २०२२ पासून १४ मुली सदर उपक्रमात सहभागी झाल्या आहेत.

Ad on course आणि पोलीस प्रशिक्षण— १४ मुली

**५. <u>करियर संसद स्थापना व करियर कट्टा फलकाचे अनावरण</u>**

दिनांक १८ ऑगष्ट, २०२३ ला करियर संसद स्थापन करण्यात आली. त्यामध्ये ९ विदयार्थीनींनची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. करिअर संसदे विषयी तसेच प्रथम वर्षामध्ये प्रवेशित झालेल्या विदयार्थीनींना करियर कट्टा उपक्रमाविषयी सखोल माहिती करियर कट्टा समन्वयक प्रा. अनिता एस. धुर्वे यांनी दिली. उपक्रमात सहभाग होण्यास महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर यांनी आव्हान केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर हे होते. तसेच महाविदयालयातील प्राध्यापक, विदयार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

**६. <u>करियर कट्टा उपक्रमात विदयार्थी नोंदनी—</u>**

सत्र २०२३—२०२४ मध्ये एकूण— १० विदयार्थीनी प्रवेश घेण्यार आहेत. तसेच १० विदयार्थीनींनीचे एकूण ३६५० रू जमा झालेले असून आणखी विदयार्थीनींना प्रवेश घेण्याकरिता प्रोत्साहित करण्यात येत आहे.